सकाळ
गुरुवार, ४ फेब्रुवारी २०२१

## छत्रपती शिवाजी कॉलेजात उजळणी वर्ग

**सातारा :** येथील छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान व युजीसी दिल्लीच्या मनुष्यबळ विकास केंद्र व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे याच्या वतीने १७ ते २८ फेब्रुवारी या कालावधीत 'री थिंकिंग एज्युकेशन आफटर कोविड' या विषयावरील आंतरविद्याशाखीय उजळणी वर्गाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती वर्गाचे समन्वयक डॉ. बाबासाहेब कांगुणे यांनी दिली. या वर्गासाठी उच्च शिक्षण संस्थांमधील कोणत्याही विद्याशाखेतील प्राध्यापक सहभागी होऊ शकतात. उजळणी वर्गासाठी प्रा. डॉ. रोशनआरा शेख या संचालक, तर डॉ. कांगुणे हे समन्वयक म्हणून काम पाहतील. वर्गाबाबत सविस्तर माहिती कॉलेजच्या www.csc.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा.